भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

# गोदी कामगार (रोजगाराचे विनियमन) अधिनियम, १९४८

(१९४८ चा अधिनियम क्रमांक ९)

[१ नोव्हेंबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे]

# The Dock Workers (Regulation of Employment) Act, 1948

## (Act No. 9 of 1948)

[As in force on 1st November, 1977]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने
मुद्रित व प्रकाशित केले.

१९७८

[किंमत ४० पैसे]

## गोदी कामगार ( रोजगाराचे विनियमन ) अधिनियम, १९४८

कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव आणि विस्तार.

२. व्याख्या.

३. कामगारांचा नियमित रोजगार सुनिश्चित करण्यासाठी योजना.

४. योजना तयार करणे, त्यात फेरफार करणे व त्या प्रत्याहृत करणे.

५. सल्लागार समिति.

५क. गोदी कामगार मंडळ.

५ब. मंडळाची कार्ये.

५ग. हिशेब आणि लेखापरीक्षा.

६. निरीक्षक.

६क. चौकशीचा आदेश देण्याची शक्ती.

६ब. मंडळे निष्प्रभावी करण्याची शक्ती.

६ग. मंडळाच्या आणि सल्लागार समितीच्या कृती किंवा कार्यवाही विधिबाह्य ठरवावयाच्या नाहीत.

७. गुन्ह्यांची दखल घेणे.

७क. कंपन्यांनी केलेले गुन्हे.

८. नियम करण्याची शक्ती.

९. व्यावृत्ती.

(शा. म. मु.) एच ४८३८ (१,०५५–४-७८)

# गोदी कामगार ( रोजगाराचे विनियमन ) अधिनियम, १९४८

(१९४८ चा अधिनियम क्रमांक ९)

[४ मार्च, १९४८]

**गोदी कामगारांच्या रोजगाराचे विनियमन करण्यासाठी उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी** गोदी कामगारांच्या रोजगाराचे विनियमन करण्यासाठी उपबंध करणे समयोचित आहे; **त्याअर्थी** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :---

संक्षिप्त नाव आणि विस्तार.

१. (१) या अधिनियमाला 'गोदी कामगार (रोजगाराचे विनियमन) अधिनियम, १९४८' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [1][जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून] संपूर्ण भारतभर आहे.

व्याख्या.

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,---

[2][(क) "मंडळ" याचा अर्थ, कलम ५ क खाली स्थापन करण्यात आलेले 'गोदी कामगार मंडळ' असा आहे ;]

[3][(कक्)] "जहाजी माल" यामध्ये जहाजातून किंवा अन्य जलयानातून वाहून नेलेल्या किंवा वाहून न्यावयाच्या कोणत्याही गोष्टीचा समावेश आहे ;

(ख) "गोदी कामगार" याचा अर्थ, कोणत्याही बंदरात किंवा बंदराच्या आसपास जहाजी माल चढवणे किंवा उतरवणे, हलवणे किंवा साठवणे यासंबंधातील कामावर किंवा जहाजी माल ताब्यात घेण्यासाठी किंवा पाठवण्यासाठी किंवा बंदर सोडण्यासाठी जहाजे किंवा अन्य जलयाने सज्ज करण्याच्या संबंधातील कामावर ठेवण्यात आलेली किंवा ठेवावयाची व्यक्ती असा आहे ;

(ग) "नियोक्ता" याचा गोदी कामगाराच्या संबंधातील अर्थ, पूर्वोक्ताप्रमाणे ज्या व्यक्तीने त्याला कामावर ठेवून घेतले असेल किंवा जी ठेवणार असेल ती व्यक्ती असा आहे ;

(घ) "शासन" याचा अर्थ, कोणत्याही मोठ्या बंदराच्या संबंधात केंद्र शासन आणि अन्य कोणत्याही बंदराच्या संबंधात राज्य शासन असा आहे ;

(ङ) "योजना" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेली योजना असा आहे,.

कामगारांचा नियमित रोजगार सुनिश्चित करण्यासाठी योजना.

३. (१) बंदराच्या ठिकाणी रोजगार अधिक नियमित होण्याची सुनिश्चिती करण्याच्या, तसेच नोंदलेल्या किंवा न नोंदलेल्या गोदी कामगारांच्या रोजगाराचे विनियमन करण्याच्या दृष्टीने गोदी कामगार व नियोक्ते यांच्या नोंदणीसाठी योजना तयार करून त्याद्वारे उपबंध करता येईल.

(२) विशेषतः या योजनेद्वारे पुढील गोष्टींसाठी उपबंध करता येईल,---

(क) गोदी कामगारांचे किंवा नियोक्त्यांचे जे वर्ग त्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा वर्गांना ती योजना लागू करण्यासाठी;

(ख) गोदी कामगार [4][व नियोक्ते] यांनी कोणत्या आबंधनांची पूर्ती केली असता त्यांना ही योजना लागू होईल व कोणत्या परिस्थितीत ही योजना कोणत्याही गोदी कामगारांना किंवा नियोक्त्यांना लागू होण्याचे बंद होईल ते निश्चित करण्यासाठी ;

(ग) गोदी कामगारांची भरती व त्यांचा योजनेत प्रवेश, आणि नोंदपुस्तके ठेवणे, नोंदपुस्तकातून नावे तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे आणि नोंदणीसाठी फी आकारणे यांसुद्धा [5][गोदी कामगारांची आणि नियोक्त्यांची नोंदणी] यांचे विनियमन करण्यासाठी ;

(घ) नोंदलेल्या किंवा न नोंदलेल्या गोदी कामगारांचा रोजगार आणि पारिश्रमिकाचे दर, कामाचे तास आणि त्या संबंधातील सुट्या व वेतन यांबाबतच्या शर्ती यांसुद्धा अशा रोजगाराच्या अटी व शर्ती यांचे विनियमन करण्यासाठी ;

---

[1] १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ आणि अनुसूचीद्वारे "भाग ख राज्ये खेरीजकरून" याऐवजी घातले.

[2] १९६२ चा अधिनियम ८, कलम २ द्वारे घातले (१ जून १९६२ रोजी व तेव्हापासून).

[3] १९६२ चा अधिनियम ८, कलम २ द्वारे खंड (क्) याला "खंड (कक्)" असा नवीन क्रमांक दिला (१ जून १९६२ रोजी व तेव्हापासून).

[4] १९६२ चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे घालण्यात आले (१ जून १९६२ रोजी व तेव्हापासून).

[5] १९६२ चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे "आणि त्यांची नोंदणी" याऐवजी घातले (१ जून १९६२ रोजी व तेव्हापासून).

(ड्) ज्यांना ही योजना लागू असेल आणि जे कामासाठी उपलब्ध असतील अशा कामगारांना ज्या ज्या कालावधीत रोजगार किंवा पूर्णकाल रोजगार उपलब्ध नसेल त्या त्या कालावधीत किमान वेतन मिळण्याची निश्चिती करण्यासाठी ;

(च्) ज्यांना ही योजना लागू होत नसेल अशा गोदी कामगारांचा रोजगार आणि ज्यांना ही योजना लागू होत नसेल अशा नियोक्त्यांनी गोदी कामगारांना कामावर ठेवणे हे प्रतिषिद्ध करणे, त्यावर निर्बंध घालणे किंवा अन्यथा नियंत्रण ठेवणे यासाठी ;

(छ्) गोदी कामगारांचे प्रशिक्षण आणि कल्याण याबाबत उपरोक्त योजना सोडली तर अन्य कोणतीही समाधानकारक तरतूद अस्तित्वात नाही म्हणून, त्यांचे प्रशिक्षण आणि कल्याण यांसाठी ;

[1][ (छछ) मंडळाचे अधिकारी आणि अन्य कर्मचारी यांच्या कल्याणासाठी ; ]

(ज्) गोदी कामगारांना जेथे रोजगाराला ठेवले जाते त्या ठिकाणी आरोग्य आणि सुरक्षितता यांबाबतच्या उपाययोजनांबाबत उपरोक्त योजना सोडली तर अन्य कोणतीही समाधानकारक तरतूद अस्तित्वात नाही म्हणून, त्या ठिकाणच्या आरोग्य आणि सुरक्षितता यांविषयीच्या उपाययोजनांसाठी ;

(झ्) योजना राबवण्याचा खर्च कशा रीतीने व कोणत्या व्यक्तींनी करावयाचा त्याबाबत ;

[2][(ञ्) योजनेच्या प्रशासनास जबाबदार असणारे [3]*** प्राधिकरण घटित करण्यासाठी ;]

(ट्) योजनेच्या प्रयोजनांसाठी आवश्यक किंवा समयोचित असतील अशा आनुषंगिक आणि पूरक बाबींसाठी.

(३) योजनेत आणखी असाही उपबंध करता येईल की, त्या योजनेच्या कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण झाल्यास तो गुन्हा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, पण काही झाले तरी पहिल्या व्यतिक्रमणाच्या बाबतीत तीन महिन्यांपेक्षा किंवा त्यानंतरच्या कोणत्याही व्यतिक्रमणाच्या बाबतीत सहा महिन्यांपेक्षा अधिक नाही इतक्या मुदतीच्या कारावासास, अथवा विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा, पण काही झाले तरी पहिल्या व्यतिक्रमणाच्या बाबतीत पाचशे रुपयांपेक्षा किंवा त्यानंतरच्या कोणत्याही व्यतिक्रमणाच्या बाबतीत एक हजार रुपयांपेक्षा अधिक नाही इतक्या रकमेच्या द्रव्यदंडास अथवा कारावास व द्रव्यदंड अशा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

**योजना तयार करणे, त्यांत फेरफार करणे व त्या प्रत्याहृत करणे.**

४. (१) शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रकाशनाच्या शर्तींच्या अधीनतेने, एखाद्या बंदरासाठी किंवा बंदरांच्या गटासाठी एक किंवा अधिक योजना तयार करता येतील आणि त्याने तयार केलेल्या कोणत्याही योजनेत तशाच रीतीने आणि तशाच शर्तींच्या अधीनतेने, कोणतीही भर घालता येईल, आपरिवर्तन करता येईल, फेरफार करता येतील किंवा ती प्रत्याहृत करता येईल.

(२) 'सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १८९७' (१८९७ चा १०) याच्या कलम २३ चे उपबंध हे पूर्व प्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने नियम करण्यासाठी एखाद्या केंद्रीय अधिनियमाने दिलेल्या शक्तीचा वापर करण्याबाबत जसे लागू होतात तसे ते पोट-कलम (१) द्वारे देण्यात आलेल्या शक्तीचा वापर करण्याबाबत लागू होतील.

(३) केंद्र शासन कोणत्याही बंदराच्या प्राधिकरणाला वेळोवेळी देण्यात येतील अशा सूचनांनुसार त्याने त्या बंदरासाठी एक किंवा त्याहून अधिक प्रारूप योजना तयार कराव्यात असा निदेश देऊ शकेल आणि बंदर प्राधिकरण अशा निदेशाचे अनुपालन करील.

**सल्लागार समिति.**

५. (१) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही योजनेच्या प्रशासनामधून उद्भवणाऱ्या ज्या बाबी शासन सल्ल्यासाठी निर्देशित करील अशा बाबींवर सल्ला देण्यासाठी शासनाला एक सल्लागार समिती स्थापन करता येईल किंवा शासनाने कलम ४ खाली कोणतीही योजना करण्याचे ठरवल्यास शासन तशी समिती स्थापन करील.

[4][(२) सल्लागार समितीच्या सदस्यांची नियुक्ती शासनाकडून करण्यात येईल आणि या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल तितकी त्यांची संख्या असेल आणि तशा रीतीने त्यांची निवड करण्यात येईल :

परंतु सल्लागार समितीमध्ये,—

(एक) शासनाचे,

(दोन) गोदी कामगारांचे, आणि

(तीन) गोदी कामगारांच्या नियोक्त्यांचे आणि नौवहन कंपन्यांचे—

प्रतिनिधित्व करणारे सदस्य समाविष्ट असतील व त्यांची संख्या समसमान असेल.]

---

[1] १९७० चा अधिनियम ३१, कलम २ द्वारे घातले.

[2] १९४९ चा अधिनियम २९, कलम २ द्वारे खंड (ञ) ऐवजी घातले.

[3] १९६२ चा अधिनियम ८, कलम ३ द्वारे "निगम निकाय असो किंवा अन्यथा असो" याऐवजी घातले.

[4] १९६२ चा अधिनियम ८, कलम ४ द्वारे पोट-कलम (२) ऐवजी घातले (१ जून १९६२ रोजी व तेव्हापासून).

(३) सल्लागार समितीचा अध्यक्ष हा, शासनाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सदस्यांपैकी ज्या एकाला शासनाने त्याबाबतीत नामनिर्देशित केले आहे असा सदस्य असेल.

(४) शासन सल्लागार समितीच्या सर्व सदस्यांची नावे शासकीय राजपत्रात प्रकाशित करील.

[१] * * * * * * * * * * * *

[२][५क. (१) शासनाला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, एकेका बंदरासाठी किंवा बंदरांच्या गटासाठी, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने एकेक गोदी कामगार मंडळ स्थापन करता येईल. गोदी कामगार मंडळ.

(२) असे प्रत्येक मंडळ म्हणजे उपरोक्त नावाचा एकेक निगम निकाय असेल आणि त्याला संपत्ती संपादन करण्याच्या, धारण करण्याच्या आणि विल्हेवाट करण्याच्या, तसेच संविदा करण्याच्या शक्तीसह उत्तराधिकाराची निरंतर परंपरा व एक सामान्य मोहोर असेल व उक्त नावाने त्याला दावा लावता येईल किंवा त्याच्यावर दावा लावता येईल.

(३) असे प्रत्येक मंडळ हे, अध्यक्ष आणि शासन नियुक्त करील तितके अन्य सदस्य मिळून बनलेले असेल :

परंतु अशा प्रत्येक मंडळात,---

(एक) शासनाचे,

(दोन) गोदी कामगारांचे, आणि

(तीन) गोदी कामगारांच्या नियोक्त्यांचे, आणि नौवहन कंपन्यांचे---

प्रतिनिधित्व करणारे सदस्य समाविष्ट असतील व त्यांची संख्या समसमान असेल.

(४) मंडळाचा अध्यक्ष हा, शासनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांपैकी ज्या एकाला शासनाने त्या बाबतीत नामनिर्देशित केले आहे असा सदस्य असेल.

५ख. (१) मंडळ, ज्यासाठी त्याची स्थापना करण्यात आली आहे अशा बंदराकरिता किंवा बंदरांच्या गटांकरिता योजना प्रशासित करण्यास जबाबदार राहील, आणि योजनेद्वारा त्याच्याकडे प्रदान होतील अशा शक्तींचा ते वापर करील व अशी कार्ये ते पार पाडील. मंडळाची कार्ये.

(२) आपल्या शक्तींचा वापर करताना आणि आपली कार्ये पार पाडताना मंडळ, शासनाकडून कारणे लेखी नमूद करून त्याला वेळोवेळी जे निदेश देण्यात येतील अशा निदेशांना बांधलेले राहील.

५ग. (१) प्रत्येक मंडळ योग्य हिशेब आणि अन्य संबद्ध अभिलेख ठेवील, तसेच या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारा विहित करण्यात येईल अशा नमुन्यातील ताळेबंदासह वार्षिक हिशेब विवरणपत्र तयार करील. हिशेब आणि लेखा-परीक्षा.

(२) भारताचा नियंत्रक व महा लेखापरीक्षक किंवा शासन नियुक्त करील असे, कंपन्यांशी संबंधित अशा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याखाली कंपन्यांचे लेखापरीक्षक म्हणून अर्हताप्राप्त असलेले अन्य लेखापरीक्षक मंडळाच्या हिशेबांची दरवर्षी लेखापरीक्षा करतील.

(३) लेखापरीक्षकांना कोणत्याही योग्य वेळी मंडळाची हिशेबपुस्तके आणि अन्य कागदपत्रे पाहण्यासाठी उपलब्ध असतील आणि लेखापरीक्षेच्या प्रयोजनांसाठी त्यांना आवश्यक वाटतील अशी स्पष्टीकरणे आणि माहिती मागविता येईल अथवा मंडळाच्या कोणत्याही सदस्याची किंवा अधिकाऱ्याची तपासणी करता येईल.

(४) लेखापरीक्षक, आपल्या अहवालाची एक प्रत व त्यासोबत मंडळाच्या हिशेबांची लेखापरीक्षा केलेली प्रत शासनाकडे पाठवील.

(५) शासनाने निश्चित केलेला लेखापरीक्षेचा खर्च मंडळाच्या निधीतून दिला जाईल.]

६. (१) शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा बंदराच्या ठिकाणी या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ त्याला निरीक्षक म्हणून योग्य वाटतील अशा व्यक्तींची नियुक्ती करता येईल. निरीक्षक.

(२) 'भारतीय दंड संहिता, १८६०' (१८६० चा ४५) याच्या अर्थानुसार प्रत्येक निरीक्षक हा लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

(३) प्रत्येक निरीक्षक ज्या बंदरासाठी त्याची नियुक्ती झाली आहे अशा कोणत्याही बंदराच्या ठिकाणी,---

(क) जेथे गोदी कामगारांना कामावर ठेवण्यात आले आहे अशा कोणत्याही वास्तूमध्ये किंवा जलयानावर त्याला योग्य वाटेल असे काही साहाय्य (असल्यास) घेऊन प्रवेश करू शकेल;

---

[१]. १९६२ चा अधिनियम ८, कलम ४ द्वारे पोट-कलम (५) वगळले (१ जून १९६२ रोजी व तेव्हापासून).

[२]. १९६२ चा अधिनियम ८, कलम ५ द्वारे घातले (१ जून १९६२ रोजी व तेव्हापासून).

(ख) कोणत्याही प्राधिकाऱ्याला किंवा व्यक्तीला गोदी कामगारांच्या रोजगाराशी संबंधित असे कोणतेही नोंदपुस्तक, हजेरीपट किंवा अन्य दस्तऐवज सादर करण्याची आज्ञा करू शकेल आणि अशा दस्तऐवजांची तपासणी करू शकेल ;

(ग) बंदरासाठी केलेल्या कोणत्याही योजनेच्या उपबंधाचे अनुपालन होत आहे अथवा झाले आहे किंवा नाही याची खातरजमा करून घेण्यासाठी कोणत्याही व्यक्तींची जागच्या जागी किंवा अन्यथा साक्ष घेता येईल.

(४) शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे योजनेच्या कोणत्याही उपबंधांच्या व्यतिक्रमणाच्या संबंधातील तक्रारी निरीक्षकाकडे कशा रीतीने व कोणत्या व्यक्तींना करता येतील ते आणि अशा तक्रारींच्या संबंधातील निरीक्षकाची कर्तव्ये विहित करता येतील.

[1][ **चौकशीचा आदेश देण्याची शक्ती.**

६क. (१) शासनाला, कोणत्याही वेळी, मंडळाच्या कामकाजाबाबत अन्वेषण किंवा चौकशी करून त्याबाबतचा अहवाल शासनाला सादर करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करता येईल.

(२) मंडळ याप्रमाणे नियुक्त केलेल्या व्यक्तीला अन्वेषणाचे व चौकशीचे काम योग्य रीतीने चालावे यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देईल आणि मंडळाकडे असलेले व त्या व्यक्तीला आवश्यक असलेले असे दस्तऐवज, हिशेब किंवा माहिती पुरवील.

**मंडळे निष्प्रभावी करण्याची शक्ती.**

६ख. (१) कलम ६क खालील अहवाल विचारात घेतल्यावर किंवा अन्यथा जर शासनाचे असे मत झाले की,—

(क) बिकट प्रसंगामुळे मंडळ आपली कार्ये पार पाडण्यास असमर्थ आहे, किंवा

(ख) मंडळाने आपली कार्ये पार पाडण्याच्या बाबतीत कसूर करण्याचा हेका चालवला आहे अथवा स्वतःच्या शक्तींचा अतिक्रम किंवा गैरवापर केला आहे,

तर शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपुरते मंडळ निष्प्रभावी करू शकेल :

परंतु, शासन खंड (ख) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणत्याही कारणास्तव या पोटकलमाखाली अधिसूचना काढण्यापूर्वी, मंडळाला निष्प्रभावी का करू नये याचे कारण दाखविण्याची वाजवी संधी मंडळाला देईल आणि मंडळाची काही स्पष्टीकरणे आणि आक्षेप असल्यास त्यांचा विचार करील.

(२) पोट-कलम (१) खालील अधिसूचना प्रकाशित केल्यानंतर,—

(क) मंडळाचे सर्व सदस्य, अशा प्रकाशनाच्या दिनांकी व तेव्हापासून आपली पदे सोडतील ;

(ख) निष्प्रभावनाच्या कालावधीमध्ये, नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली व्यक्ती मंडळाला वापरता येतील अशा शक्तींचा वापर करील व त्याला पार पाडता येतील अशी कार्ये पार पाडील ;

(ग) मंडळाचे ठायी निहित असलेले सर्व निधी आणि अन्य संपत्ती निष्प्रभावनाच्या कालावधीमध्ये शासनाचे ठायी निहित होईल.

(३) पोट-कलम (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावनाचा कालावधी संपल्यावर शासनाला—

(क) निष्प्रभावनाचा कालावधी त्याला आवश्यक वाटेल इतक्या मुदतीपर्यंत पुढे वाढवता येईल ;

(ख) कलम ५क मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने मंडळाची पुनःस्थापना करता येईल.

**मंडळाच्या आणि सल्लागार समितीच्या कृती किंवा कार्यवाही विधिबाह्य ठरवावयाच्या नाहीत.**

६ग. मंडळाची किंवा सल्लागार समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केवळ—

(क) मंडळामध्ये किंवा सल्लागार समितीमध्ये एखादे रिक्त पद आहे किंवा त्यांच्या घटनेत कोणतीही उणीव आहे, किंवा

(ख) मंडळाचा किंवा सल्लागार समितीचा सदस्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीत कोणतीही उणीव आहे, किंवा

(ग) मंडळाने किंवा सल्लागार समितीने अनुसरलेल्या प्रक्रियेत असलेल्या एखाद्या नियमबाह्य गोष्टीमुळे त्या त्या प्रकरणाच्या गुणवत्तेवर परिणाम होत नसल्यास, त्यात अशी नियमबाह्य गोष्ट आहे, या कारणाने विधिबाह्य होणार नाही.]

**गुन्ह्यांची दखल घेणे.**

७. (१) कोणतेही न्यायालय, एखाद्या योजनेद्वारे शिक्षापात्र ठरलेला गुन्हा किंवा त्याचे कोणतेही अपप्रेरण याबाबत निरीक्षकाने किंवा शासनाकडून विशेषरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीने अशा गुन्ह्याला किंवा अपप्रेरणाला घटकभूत होणाऱ्या तथ्यांचा लेखी अहवाल दिला असल्याखेरीज एरव्ही त्याची दखल घेणार नाही.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) या मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी योजनेद्वारे शिक्षापात्र ठरवलेला गुन्हा किंवा त्याचे अपप्रेरण हे केवळ इलाखा दंडाधिकाऱ्याने किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याने संपरीक्षा करण्यायोग्य असेल.

---

[1] १९६२ चा अधिनियम ८, कलम ६ द्वारे घातले (१ जून, १९६२ रोजी व तेव्हापासून).

[1][७क. (१) योजनेद्वारे शिक्षापात्र ठरलेला गुन्हा करणारी किंवा त्यास अपप्रेरणा देणारी व्यक्ती ही जर कंपनी असेल तर, गुन्हा केला गेला किंवा त्यास अपप्रेरणा दिली गेली त्यावेळी कंपनीचा कारभार चालवण्याबाबत प्रभारी असलेली आणि जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनीही गुन्ह्याबद्दल किंवा अपप्रेरणाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही चालू केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा होण्यास पात्र होईल : कंपन्यांनी केलेले गुन्हे.

परंतु, जर एखाद्या व्यक्तीने तो गुन्हा किंवा अपप्रेरण आपल्या नकळत घडले अथवा असा गुन्हा किंवा अपप्रेरण घडू नये म्हणून आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परता दाखवली होती असे शाबीत केले तर, या पोट-कलमातील कशामुळेही अशी व्यक्ती कोणत्याही शिक्षेला पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी योजनेद्वारे शिक्षापात्र ठरवण्यात आलेला गुन्हा किंवा अपप्रेरण हे कंपनीने केले असेल आणि तो गुन्हा किंवा अपप्रेरण हे कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मुकनुमतीने घडले किंवा त्याच्याकडून झालेली हयगय किंवा अपप्रेरण यांच्याशी त्या गुन्ह्याचा कारणसंबंध जोडता येण्यासारखा आहे असे शाबीत केले गेल्यास, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हासुद्धा त्या गुन्ह्याबद्दल किंवा अपप्रेरणाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्या विरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार त्याला शिक्षा केली जाण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**---या कलमाच्या प्रयोजनांकरिता,---

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम निकाय असा आहे आणि त्यामध्ये पेढी आणि अन्य व्यक्तिसंघ यांचा समावेश आहे; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, पेढीतील भागीदार असा आहे.]

[2][८. (१) शासनाला या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यासाठी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. **नियम करण्याची शक्ती.**

(२) विशेषतः आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे पुढील बाबतीत उपबंध करता येतील,---

(क) सल्लागार समिती आणि मंडळे यांची रचना आणि सल्लागार समितीचे व मंडळाचे सदस्य यांची निवड करण्याची रीत ;

(ख) मंडळाच्या किंवा सल्लागार समितीच्या सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्यामधील निमित्तवशात् रिक्त होणारी पदे भरण्याची रीत ;

(ग) मंडळाच्या आणि सल्लागार समितीच्या बैठकी, अशा बैठकींची गणसंख्या आणि बैठकीतील कामकाजाचे चालन ;

(घ) मंडळाला किंवा मंडळाच्या वतीने ज्या शर्तींच्या अधीनतेने आणि ज्या पद्धतीने संविदा करता येतील त्या शर्ती आणि ती पद्धत ;

(ङ) मंडळाच्या किंवा सल्लागार समितीच्या सदस्यांना देय असे काही भत्ते असल्यास ते ;

(च) मंडळाच्या सदस्यत्वाबाबतच्या निरर्हता ;

(छ) मंडळाला आपले वार्षिक हिशेब विवरणपत्र आणि ताळेबंद ज्या नमुन्यात तयार करावा लागेल तो नमुना.

(३) या अधिनियमाखाली केंद्र शासनाने केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने किंवा दोन क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीत सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवला गेला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर तो नियम त्यानंतर अशा आपरिवर्तित रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही; तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

९. कलम ४ खाली तयार केलेल्या योजनेखाली एखाद्या बंदराकरिता किंवा बंदरांच्या एखाद्या गटाकरिता जे गोदी कामगार मंडळ 'गोदी कामगार (रोजगार विनियमन) विशोधन अधिनियम, १९६२' (१९६२ चा ८) याच्या प्रारंभापूर्वी स्थापन करण्यात आले असेल किंवा अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी असे मंडळ म्हणून कार्य करीत असेल ते मंडळ, कलम ५क खाली स्थापन करण्यात आलेले मंडळ असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, अशा प्रत्येक मंडळाला या अधिनियमाचे सर्व उपबंध लागू होतील.] व्यावृत्ती.

---

[1] १९७० चा अधिनियम ३१, कलम ३ द्वारे घातले.

[2] १९६२ चा अधिनियम ८, कलम ७ द्वारे घातले (१ जून १९६२ रोजी व तेव्हापासून).

## THE DOCK WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT) ACT, 1948

### गोदी कामगार (रोजगाराचे विनियमन) अधिनियम, १९४८

#### इंग्रजी---मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| attributable to | ---शी कारणसंबंध जोडता येण्यासारखा | [S.7A(2)] |
| cargo | जहाजी माल | [S.2(*aa*)] |
| dock worker | गोदी कामगार | [S.2(*b*)] |
| draft scheme | प्रारूप योजना | [S.4(3)] |
| employer | नियोक्ता | [S.2(*c*)] |
| employment | रोजगार | [Short title] |
| irregularity | नियमबाह्य गोष्ट | [S.6C(*c*)] |
| major port | मोठे बंदर | [S.2(*d*)] |
| port authority | बंदर प्राधिकरण | [S.4(3)] |
| recruitment | भरती | [S.3(2)(*c*)] |
| regularity of employment | रोजगार नियमित होणे | [S.3(1)] |
| remuneration | पारिश्रमिक | [S.3(2)(*d*)] |
| scheme | योजना | [S.2(*c*)] |
| ship | जहाज | [S.2(*aa*)] |
| shipping company | नौवहन कंपनी | [S.5(2)(*iii*)] |
| supersede | निष्प्रभावी करणे | [S.6B] |
| vessel | जलयान | [S.2(*aa*)] |

### गोदी कामगार (रोजगाराचे विनियमन) अधिनियम, १९४८

## THE DOCK WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT) ACT, 1948

#### मराठी---इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| गोदी कामगार | dock worker | [S.2(*b*)] |
| जलयान | vessel | [S.2(*aa*)] |
| जहाज | ship | [S.2(*aa*)] |
| जहाजी माल | cargo | [S.2(*aa*)] |
| नियमबाह्य गोष्ट | irregularity | [S.6C(*c*)] |
| नियोक्ता | employer | [S.2(*c*)] |
| निष्प्रभावी करणे | supersede | [S.6B] |
| नौवहन कंपनी | shipping company | [S.5(2)(*iii*)] |
| पारिश्रमिक | remuneration | [S.3(2)(*d*)] |
| प्रारूप योजना | draft scheme | [S.4(3)] |
| बंदर प्राधिकरण | port authority | [S.4(3)] |
| भरती | recruitment | [S.3(2)(*c*)] |
| मोठे बंदर | major port | [S.2(*d*)] |
| योजना | scheme | [S.2(*e*)] |
| रोजगार | employment | [Short title] |
| रोजगार नियमित होणे | regularity of employment | [S.3(1)] |
| ---शी कारणसंबंध जोडता येण्यासारखा | attributable to | [S.7A(2)] |